जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांनी त्यांच्या उत्पन्नाच्या किमान १५ टक्के रक्कम खर्च करण्याबाबत -

महाराष्ट्र शासन,
ग्राम विकास विभाग,
परिपत्रक क्रमांक: मागास १०८९/प्र.क. ५५५/३४
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२, दिनांक : ५ ऑक्टोबर, १९८९

प्रस्तावना:- जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांनी त्यांच्या उत्पन्नाच्या १५ टक्के रक्कम मागासवर्गीयांसाठी खर्च करण्याबाबत शासन निर्णय, मागास १०८९/ प्र.क्र. ४१८/३४, दिनांक १४ सप्टेंबर १९८९ अन्वये सर्वसमावेशक आदेश रवाना करण्यात आले आहेत. अनुसूचित कल्याण समितीच्या असे निदर्शनास आले आहे की, एकाच कुटुंबातील अनेक व्यक्तिंना वेगवेगळ्या योजनांतर्गत लाभ होणार असेल तर या किमान १५ टक्के अनुदानाचा उद्देश सफल होणारच नाही. एवढेच नव्हे तर, १५ टक्के अनुदानामधील रक्कम ठराविक कुटुंबियांच्या उन्नतीसाठी वापरली जाईल ते होऊ नये म्हणून, शासनाने जिल्हा परिषदांना अशा प्रकारचे अनुदान पुर्णपणे बंद करावे. ही सूचना शासनाने मान्य केली असून, खालीलप्रमाणे आदेश देत आहे :-

परिपत्रक : अनुसूचित कल्याण समितीने दिलेल्या सूचना लक्षात घेऊन, सर्व जिल्हा परिषदाना कळविण्यात येते की, सर्व जिल्हा परिषदांनी सोबतच्या प्रपत्रात नोंदवही तयार करुन सर्व मागासवर्गीय जातनिहाय/गावनिहाय याद्या तयार कराव्या ज्यावेळी लाभार्थीला वैयक्तिक सहाय्य १५ टक्के अनुदानातू दिले जाईल, त्यावेळी त्या अनुदानाची नोंद या प्रपत्राप्रमाणे ठेवलेल्या नोंदवहीत घ्यावी. एकाच कुटूंबातील एकापेक्षा अधिक व्यक्तिंना या योजनेचा फायदा किंवा आर्थिक लाभ होणार नाही अशी दक्षता घ्यावी लागेल. त्याच कुटूंबातील दुसरी व्यक्ती या योजनेचा फायदा उचलू शकणार नाही, जेव्हा आपण केलेली यादी पुर्णपणे संपुष्टात आली असेल आणि प्रत्येक कुटूंबातील किमान एका व्यक्तिला या योजनेचा लाभ मिळेल तेव्हा दुसरी व्यक्ती या योजनेचा लाभ घेऊ शकेल.

२. जिल्हा परिषदा व पंचायत समित्या यांच्या उत्पन्नाच्या १५ टक्के रक्कम खर्च करण्यासंबधी योजना अंमलात आणीत असतांना नोंदवहीत या सर्व वस्तुंची नोंद होणे अत्यावश्यक असेल. ही नोंदवही गट विकास अधिकारी यांनी नियमीतपणे तपासावी. त्याच बरोबर समाज कल्याण अधिकारी/मुख्य कार्यकारी

Panchayat Samiti
Dept. ...
Date of Receipt ... 2003
Inward No. ...
Work Sheet No. ...
Initial of B. D. O.

....२/-

अधिकारी यांनीही त्यांच्या भेटीच्या वेळी ही नोंदवही तपासावी. आयुक्त, किंवा सहाय्यक आयुक्त [ विकास] हे जेव्हा दौ-यांवर किंवा कार्यालयीन निरीक्षणाचे वेळी जातील तेव्हाही त्यांनी या नोंदवहिचा तपासणी यादीत उल्लेख करावा आणि ती नोंदवही तपासावी. हेतू हा की, शासनाने काढलेल्या आदेशांचे पुर्णपणे व काटेकोरपणे पालन होते की नाही जर एखाद्या जिल्हा परिषद अथवा पंचायत समितीत या आदेशांचे पालन होत नसेल तर त्या जिल्हा परिषदेला आदेशाचे पालन करण्यास भाग पाडले जाईल, याचीही नोंद घेण्यास जिल्हा परिषदांना सांगावे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने

सही/-
[ भास्कर पाटील ]
सह सचिव, महाराष्ट्र शासन,
ग्राम विकास विभाग.

--------xxxx--------

क्र. सकवि/योजना/ प्र. ४/ आर आर/१२७ /९३.
समाज कल्याण विभाग, जि. प. जळगांव.
दिनांक :- ३०. ७. ९३.

प्रति:- १] सर्व खातेप्रमुख [ सर्व] जि. प. जळगांव.
म. गट विकास अधिकारी, भुसावळ
पंचायत समिती, [सर्व] जि. जळगांव.

२/- यांना माहीतीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी पुनश्च रवाना सोबतच्या तक्त्याप्रमाणे नोंदवही ठेवणे बाबतची कार्यवाही करावी.

समाज कल्याण अधिकारी, (वर्ग)
जि. प. जळगांव.

Scanned with CamScanner